(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[२०२३] ३ एस. सी. आर. ४३१

बी. एस. हरी कमांडंट

-विरुद्ध-

युनियन ऑफ इंडिया आणि इतर

(फौजदारी अपील क्र. १८९०/२०१४)

१३ एप्रिल २०२३

**[कृष्णा मुरारी आणि अहसानउद्दीन अमानुल्लाह, न्यायमूर्ती]**

सीमा सुरक्षा दल अधिनियम, १९६८ - अपीलकर्ता - सीमा सुरक्षा दलातील कमांडंटला १० वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली; रु. १,००,०००/- लाखाचा दंड ठोठावण्यात आला - आणि त्याच्या नियंत्रणाखालील सीमा कुंपण गेटवरून भारतातून पाकिस्तानमध्ये प्रतिबंधित वस्तूंच्या तस्करीला परवानगी दिल्याच्या आरोपावरून सेवेतून बडतर्फ- असे मत व्यक्त केले कि: सशस्त्र दलांमध्ये निमलष्करी दलांसह, जरी अत्यंत शिस्त, आदेशाची एकता ही अपरिहार्य बाब असली तरी, प्रमाणबद्धतेचा सिद्धांत अजूनही प्रचलित आहे- सध्याच्या प्रकरणात, अपीलकर्त्याच्या विरोधात कोणताही थेट पुरावा नाही - सुभेदाराने (जो कथितपणे ज्या भागात हा प्रकार घडला त्या भागाचा प्रत्यक्ष प्रभारी होता) अपीलकर्त्याचा सहभाग असल्याबाबत दिलेले जवाब वगळता, त्याच्या विरोधात कोणतेही पुरावे नाहीत - केवळ एकाच व्यक्तीच्या जवाबामुळे, त्याला दोषी ठरवणारे किंवा त्याच्या अपराधाकडे लक्ष वेधणारे इतर तथ्य असल्याशिवाय त्याला दोषी ठरविण्यात येऊ नये - अशा प्रकारे, अपीलकर्त्याच्या विरोधात थेट आणि ठोस पुराव्याच्या अनुपस्थितीत, जरी सामान्य सुरक्षा दल न्यायालयाला (जी. एस. एफ. सी.) त्याच्या गुन्ह्याची खात्री पटली असली, तरी दिलेली शिक्षा खूप कठोर आणि असमान होती - अपीलकर्ता यांनी पहिल्यांदाच गुन्हा केला असून सराईत अपराधी नव्हता - शिवाय, अपीलकर्त्याने ३१ १/२ वर्षांहून अधिक काळ दोष किंवा कलंक न लागता देशाची सेवा केली आहे आणि भारताच्या माननीय राष्ट्रपतींकडून पदकासह विविध पुरस्कार प्राप्त केले आहेत - त्याचा ट्रॅक रेकॉर्ड अन्यथा निर्विवाद आहे - उच्च न्यायालयाचा आक्षेपित निकाल रद्द - जी. एस. एफ. सी. ने

दिलेली शिक्षा आणि दोषसिद्धी रद्द - अपीलकर्ता सेवानिवृत्तीच्या तारखेपासून आजपर्यंत पूर्ण सेवानिवृत्त लाभ मिळण्यास पात्र - अंमली पदार्थ अधिनियम, १९८५ - प्रमाणबद्धतेचा सिद्धांत (डॉक्ट्रिन ऑफ प्रोपोर्शनॅलिटी) - सशस्त्र सेना.

भारतीय राज्यघटना - अनुच्छेद २२६:

फौजदारी रिट याचिका - पुराव्यांद्वारे छाननी करण्याचा उच्च न्यायालयांचा अधिकार - यावर चर्चा करण्यात आली.

अधिकाराच्या वापरावरील मर्यादा - असे मत व्यक्त केले कि : अनुच्छेद २२६ हे अन्यायाच्या निवारणासाठी मदत प्रदान करते आणि अशा अधिकाराच्या वापरावरील कोणतीही मर्यादा केवळ स्वतः लादलेली असतात.

न्यायनिर्णय/आदेश - परिच्छेदनिहाय क्रमांकन- असे मत व्यक्त केले कि : सर्व न्यायालयांनी आणि न्यायाधिकरणांनी, व्यवहारातील बाब म्हणून, सर्व आदेश आणि निकालांमध्ये परिच्छेदांना यथानुक्रम देणे इष्ट आहे - उच्च न्यायालयांच्या माननीय मुख्य न्यायाधीशांनी निर्णय आणि आदेशांसाठी, परिच्छेदासह, एकसमान स्वरूप स्वीकारण्याचा विचार करावा आणि त्यानुसार त्यांच्या उच्च न्यायालयांच्या अधीनस्थ येणाऱ्या न्यायालये आणि न्यायाधिकरणांना निर्देश द्यावेत - सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश.

**अपील मान्य करतांना न्यायालयाने**

**असे मत मांडले कि : १.१ केंद्रीय सशस्त्र दलांमध्ये, ज्यात निमलष्करी दलांचा समावेश आहे, अत्यंत शिस्त, आदेशाची एकता इत्यादी अपरिहार्य आहेत. असे म्हटले जाते की, डॉक्ट्रिन ऑफ प्रोपोर्शनॅलिटी (प्रमाणबद्धतेचा सिद्धांत) अजूनही क्षेत्र धारण करतो. अपीलकर्त्याविरुद्ध थेट आणि ठोस पुराव्याच्या अनुपस्थितीत, जरी जी. एस. एफ. सी. ला अपीलकर्त्याच्या गुन्ह्याची खात्री पटली असली, तरी दिलेली शिक्षा खूप कठोर होती, तरीही, अपीलकर्त्याने, प्रथमच गुन्हा केला असेल, आणि सराईत अपराधी नसेल, याकडे लक्ष द्यायला पाहिजे होते. युक्तिवादा करीता जरी असे मानण्यात आले कि, आरोपांमध्ये काही प्रमाणात सत्यतेचा आभास होता, तरीही दिलेली शिक्षा प्रमाणहीन होती. [परिच्छेद ३६, ३७] [४४२-एच; ४४३-ए-बी]**

**१.२ अपीलकर्त्याने ३१ १/२ वर्षांहून अधिक काळ दोष किंवा कलंक न लागता देशाची सेवा केली आहे आणि त्याला इतर गोष्टींबरोबरच भारताच्या माननीय**

राष्ट्रपतींकडून पदकासह विविध पुरस्कार मिळाले आहेत. अन्यथा, अपीलकर्त्याचा ट्रॅक रेकॉर्ड निर्विवाद आहे. अभिकथित गुन्हेगारीच्या बाबतीत, निर्विवाद आणि निःसंशयित वस्तुस्थिती अशी आहे की जेरीकॅन ज्या ठिकाणाहून अभिकथितपणे भारतीय बाजूने पाकिस्तानच्या नेण्यात आले होते त्या ठिकाणासह मोठ्या क्षेत्रावर कार्यरत दलाचे नेतृत्व अपीलकर्ता करत होता. तथापि, या क्षेत्राचे प्रत्यक्ष व्यवस्थापन हे दलाच्या अधीनस्थ कर्मचाऱ्यांद्वारे केले जाते याबाबतीत देखील काही वाद नाही. सध्याच्या प्रकरणात, अधीनस्थ कर्मचाऱ्यांना दोषी ठरवण्यात आले आहे, जे त्यांचा सक्रिय सहभाग दर्शवते. घटनास्थळावर हजर असल्याने, त्यांच्या देखरेखीखाली कोणतेही अपराध/गुन्हे/संशयास्पद घटना घडणार नाहीत याची खात्री करणे ही त्यांची प्राथमिक जबाबदारी होती. शिवाय, अपीलकर्त्याच्या विरोधात कोणताही थेट पुरावा नाही. [परिच्छेद ३८, ४१] [४४३-सी, ई-जी]

१.३ सुभेदार डी. एस. यांचा जवाब वगळता, अपीलकर्त्याचा सहभाग दाखविणारा, त्याच्या विरोधात कोणताही इतर पुरावा नाही. त्यामुळे, अन्य गोष्टी समान असताना, अपीलकर्त्याला दोषारोपित करणाऱ्या किंवा त्याच्या अपराधाकडे लक्ष वेधून घेणाऱ्या पुराव्यात तथ्य नसताना, केवळ एका व्यक्तीच्या जवाबामुळे, या प्रकरणात, त्याला दोषी ठरवता येऊ नये. अगदी जवळच्या काळात, अपीलकर्त्याच्या घराच्या शोधमोहिमेत कोणतीही आक्षेपार्ह कागदपत्रे/वस्तू सापडल्या नाहीत. अशी पुनःप्राप्ती न झाल्यास स्पष्टपणे त्याचा अपीलकर्त्याला फायदा होईल. [परिच्छेद ४५, ४६] [४४५-सी-डी]

१.४ राज्यघटनेचे अनुच्छेद २२६ हे अन्यायाच्या निवारणासाठी मदत प्रदान करते आणि अशा अधिकाराच्या वापरावरील कोणतीही मर्यादा केवळ स्वतः लादलेल्या असतात. घटनात्मक योजनेच्या अंतर्गत उच्च न्यायालयांना नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी विशेषाधिकारात्मक रिट जारी करण्याची क्षमता आहे. नेमके याच कारणासाठी, या न्यायालयाने कधीही अशी कोणतीही अवरोधिक तत्त्वे मांडली नाहीत जी राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ किंवा २२७ अंतर्गत निहित असलेल्या असाधारण अधिकारांना 'दडपून टाकणारी, बंदिस्त आणि मर्यादित' असल्याचे म्हटले जाऊ शकते. उच्च न्यायालयाने सखोल चौकशी करण्यासाठी हे एक योग्य प्रकरण होते, विशेषतः

**जेव्हा त्यात तथ्यांच्या क्षेत्रात संचार करणे समाविष्ट नाही. आक्षेपित निर्णय रद्द केला जातो. जी. एस. एफ. सी. ने दिलेली शिक्षा आणि शिक्षा आणि दोषसिद्धी देखील रद्द करण्यात आली. अपीलकर्ता सेवानिवृत्तीच्या तारखेपासून आजपर्यंत पूर्ण सेवानिवृत्त लाभ मिळण्यास पात्र आहे. [परिच्छेद ५०, ५१] [४४६-ई-एच; ४४७-ए]**

ई. पी. रोयप्पा -विरुद्ध- स्टेट ऑफ तामिळनाडू **ए. आय. आर. १९७४ एस. सी. ५५५: [१९७४] २ एस. सी. आर. ३२८ - अनुसरण केले.**

मोहम्मद. जमीलुद्दीन नासिर -विरुद्ध- स्टेट ऑफ  वेस्ट बेंगाल **(२०१४) ७ एस. सी. सी ४४३ : [२०१४] १४ एस. सी. आर. १;** नवाब शकफथ अली खान -विरुद्ध- नवाब इमदाद जाह बहादूर **(२००९) ५ एस. सी. सी. १६२: [२००९] ४ एस. सी. आर. ५८९;** सूर्य देव राय -विरुद्ध- राम चंदर राय **(२००३) ६ एस. सी. सी. ६७५: [२००३] २ सप्लिमेंटरी. एससीआर २९०;** ए. व्ही. वेंकटेश्वरन -विरुद्ध- रामचंद शोभराज वाधवानी **(१९६२) १ एस. सी. आर. ५७३;** यू पी स्टेट शुगर कॉर्पोरेशन लिमिटेड -विरुद्ध- कमल स्वरूप टंडन **(२००८) २ एस. सी. सी. ४१: [२००८] १ एस. सी. आर. ८८७;** शकुंतला शुक्ला -विरुद्ध- स्टेट ऑफ उत्तर प्रदेश **२०२१ एस. सी. सी. ऑनलाईन एस. सी. ६७२;** स्टेट बँक ऑफ इंडिया -विरुद्ध- अजय कुमार सूद **२०२२ एस. सी. सी. ऑनलाईन एस. सी. १०६७-यावर अवलंबून होते.**

स्टेट ऑफ झारखंड -विरुद्ध- जितेंद्र कुमार श्रीवास्तव **(२०१३) १२ एस. सी. सी. २१०: [२०१३] ८ एस. सी. आर. १७७;** वीणा पांडे -विरुद्ध- युनिअन ऑफ इंडिया **(२०२२) २ एस. सी. सी. ३७९;** कौन्सिल ऑफ सिविल सर्विसेस युनिअन्स -विरुद्ध- मिनिस्टर फॉर द सिविल सर्विस **[१९८४] ३ डब्लू एल आर ११७४ (एच एल);** भगत राम -विरुद्ध- स्टेट ऑफ हिमाचल प्रदेश **(१९८३) २ एस. सी. सी. ४४२;** रणजित ठाकूर -विरुद्ध- युनिअन ऑफ इंडिया **(१९८७) ४ एस. सी. सी. ६११ : [१९८८] १  एस. सी. आर. ५१२;** आंध्र प्रदेश इंडस्ट्रियल इन्फ्रास्ट्रक्चर कॉर्पोरेशन लिमिटेड -विरुद्ध- एस. एन. राज कुमार **(२०१८) ६ एस. सी. सी. ४१०: [२०१८] ३ एस. सी. आर. ४५५;** डी. एस. नकारा -विरुद्ध- युनिअन ऑफ इंडिया **(१९८३) १ एस. सी. सी. ३०५: [१९८३] २ एस. सी. आर. १६५;** स्टेट ऑफ वेस्ट बंगाल -विरुद्ध- हरेश सी. बॅनर्जी **(२००६) ७ एस. सी. सी. ६५१: [२००६] ५ सप्लेमेंटरी एस.सी. आर. ६२०;** डॉ. हीरालाल -विरुद्ध- स्टेट ऑफ बिहार

**(२०२०) ४ एस. सी. सी. ३४६ : [२०२०] २ एस. सी. आर. ९०७;** राधे श्याम -विरुद्ध- छबी नाथ **(२०१५) ५ एस. सी. सी. ४२३: [२०१५] ३ एस. सी. आर. १९७ – संदर्भित.**

**निर्णयविधी संदर्भ**

| | | |
|---|---|---|
| **[२०१३] ८ एस. सी. आर. १७७ मधील** | **परिच्छेद २३** | **संदर्भित** |
| **[१९८८] १ एस. सी. आर. ५१२ मधील** | **परिच्छेद ३४** | **संदर्भित** |
| **[२०१८] ३ एस. सी. आर. ४५५ मधील** | **परिच्छेद ३५** | **संदर्भित** |
| **[१९८३] २ एस. सी. आर. १६५ मधील** | **परिच्छेद ३९** | **संदर्भित** |
| **[२००६] ५ सप्ले. एस. सी. आर. ६२० मधील** | **परिच्छेद ३९** | **संदर्भित** |
| **[२०२०] २ एस. सी. आर. ९०७ मधील** | **परिच्छेद ३९** | **संदर्भित** |
| **[२०१४] १४ एस. सी. आर. १ मधील** | **परिच्छेद ४४** | **वर अवलंबित** |
| **[२००९] ४ एस. सी. आर. ५८९ मधील** | **परिच्छेद ४८** | **वर अवलंबित** |
| **[२००३] २ सप्ले. एस. सी. आर. २९० मधील** | **परिच्छेद ४९** | **वर अवलंबित** |
| **[२०१५] ३ एस. सी. आर.१९७ मधील** | **परिच्छेद ४९** | **संदर्भित** |
| **(१९६२) १ एस. सी. आर. ५७३ मधील** | **परिच्छेद ५०** | **वर अवलंबित** |
| **[२००८] १ एस. सी. आर.८८७ मधील** | **परिच्छेद ५०** | **वर अवलंबित** |
| **[१९७४] २ एस. सी. आर.३४८ मधील** | **परिच्छेद ५०** | **चे अनुसरण** |

फौजदारी अपील अधिकारिता : फौजदारी अपील क्र. १८९०/२०१४.

सी. आर. डब्ल्यू. पी. क्रमांक ३/१९९७ मधील चंदीगड येथील पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाद्वारे दि. १९/०२/२०१० रोजी पारित न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

विवेक सिंग, अपीलकर्ता तर्फे अधिवक्ता.

जयंत के. सुद, ए. एस. जी., श्रीमती सोनिया माथूर, वरिष्ठ अधिवक्ता, संजय कुमार त्यागी, हरीश पांडे, श्रीमती स्वरूपमा चतुर्वेदी, एस. एन. तेरदल, सिमरजीत सिंग सलुजा, कु. दिविक माथूर, कु. रोनिका टाटेर, कु. प्रतीक्षा मिश्रा, कु. रूपक्षी सोनी, निखिल जयस्वाल, अरविंद कुमार शर्मा, उत्तरवादिं तर्फे अधिवक्ता.

न्यायालयाचा निर्णय यांच्याद्वारे देण्यात आला

**अहसानउद्दीन अमानुल्लाह, न्यायमूर्ती.**

पक्षांतर्फे विद्वान अधिवक्तांचे म्हणणे ऐकण्यात आले.

२. प्रस्तुत फौजदारी अपील हि चंदीगड येथील पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने अपीलकर्त्याने (मूळ रिट याचिकाकर्ते) दाखल केलेली फौजदारी रिट याचिका क्रमांक ३/१९९७ (यापुढे 'उच्च न्यायालय' म्हणून संदर्भित) फेटाळत, दि. १९/०२/२०१० रोजी दिलेला अंतिम न्यायनिर्णय आणि आदेश (यापुढे 'आक्षेपित न्यायनिर्णय' म्हणून संदर्भित) [२०१० एस. सी. सी. ऑनलाईन पी. अँड एच. २५५८] याच्या विरोधात निर्देशित केले आहे. दि. २९/०८/२०१४ रोजीच्या आदेशानुसार परवानगी देण्यात आली होती.

**<u>वस्तुस्थितीः</u>**

३. अपीलकर्ता हे दि. ०९/०२/१९६४ रोजी भारतीय सैन्यात सामील झाले होते. त्यांना दि. ०४/०६/१९६९ रोजी सीमा सुरक्षा दलात (यापुढे 'दल' ('फोर्स') म्हणून संबोधले जाईल) सहाय्यक कमांडंट म्हणून समाविष्ट करण्यात आले होते. त्यानंतर, त्यांना दलातील कमांडंट पदावर पदोन्नती देण्यात आली तसेच कमांडंट पदावर निवड श्रेणी देण्यात आली. सुमारे ३० वर्षे निर्दोष सेवा दिल्याबद्दल विविध पदकांसह, १९९४ मध्ये भारताच्या माननीय राष्ट्रपतींद्वारे त्यांना पोलीस पदक प्रदान करण्यात आले होते. नंतर, त्यांची बदली पंजाबमधील ममडोट येथील मुख्यालयात असलेल्या १९५६ च्या बटालियनचे (बी. एन.) (बी. एस. एफ.) कमांडंट म्हणून करण्यात आली.

४. दि. ०५/०४/१९९५ रोजी, स्थानिक पोलिसांनी शोध घेतला आणि अंमली पदार्थ अधिनियम, १९८५ च्या कलम ९ ए अंतर्गत नियंत्रित पदार्थ असलेल्या एसिटिक एनहायड्राइडच्या काही जेरीकॅन (यापुढे "एनडीपीएस कायदा" म्हणून संदर्भित) पाकिस्तानी प्रदेशात आणि सीमेजवळील भारतीय नागरिकांच्या मालकीच्या शेतांमध्ये असल्याचे सांगितले गेले, ज्यासाठी त्याच दिवशी स्थानिक पोलिसांनी पंजाबच्या फिरोजपूर पोलिस ठाण्यात प्रथम खबरी अहवाल (एफ. आय. आर.) क्र. ९२, दि. ०५/०४/१९९५ नोंदवला ज्यात दोन व्यक्तींची नावे आरोपी म्हणून नोंदवली होती, ती म्हणजे लखविंदर सिंग आणि सुरजित सिंग उर्फ पहलवान तसेच त्यांना तस्कर असल्याचे दाखविण्यात आले होते.

५. दि. ०७/०५/१९९४ रोजी, अपीलकर्त्याला कार्यभार सोपवण्याचे आणि एस. टी. सी., दल (फोर्स), खारकान येथे जाण्याचे निर्देश देण्यात आले, जिथे त्याला अटक करण्यात आली. तथापि, अपीलकर्त्याच्या घरझडतीत कोणतीही आक्षेपार्ह सामग्री (वस्तू) सापडली नाही.

६. दि. ०९/०४/१९९५ रोजी श्री. व्ही. के. शर्मा यांच्या अधिपत्याखाली एक सदस्यीय कोर्ट ऑफ इन्क्वायरीला चौकशीचे आदेश देण्यात आले. या चौकशीत, ज्या परिसरात अभिकथित जेरीकॅनस जप्त करण्यात आले होते त्या परिसराचे वास्तविक आणि भौतिक क्षेत्र आणि नियंत्रण असलेले निरीक्षक दिदार सिंग यांनी, असे विधान केले कि अपीलकर्त्याच्या सांगण्यावरून ते या घटनेत सहभागी झाले होते.

७. चौकशी अहवालाच्या आधारे, अपीलकर्त्याला सीमा सुरक्षा दल अधिनियम, १९६८ (यापुढे 'बी. एस. एफ. अधिनियम' म्हणून संदर्भित) च्या कलम ४० आणि ४६ अंतर्गत दि. ०४/०७/१९९५ रोजीचे आरोपपत्र देण्यात करण्यात आले. मात्र, वर नमूद केल्यानुसार आरोप मागे घेण्यात आले.

८. त्यानंतर, अपीलकर्ता हे ३१ वर्षे, ६ महिने आणि २२ दिवस दलात (फोर्स मध्ये) सेवा दिल्यानंतर दि. ३१/०८/१९९५ रोजी सेवानिवृत्त झाले.

९. दि. २०/१०/१९९५ रोजी अपीलकर्त्याला तीन आरोप असलेले नवीन आरोपपत्र देण्यात आले. दोन आरोप एन. डी. पी. एस. अधिनियमाच्या कलम २५ चे उल्लंघन करून केलेल्या दिवाणी गुन्ह्यासाठी बी. एस. एफ. अधिनियमाच्या कलम ४६ अंतर्गत होते आणि बी. एस. एफ. अधिनियमाच्या कलम ४० अंतर्गत एक आरोप होता. अपीलकर्त्याविरुद्ध खटला दि. ३०/१०/१९९५ रोजी सामान्य सुरक्षा दल न्यायालय (यापुढे 'जी. एस. एफ. सी.' म्हणून संदर्भित) बोलावून सुरू करण्यात आला.

१०. अपीलकर्त्याने भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ चा (यापुढे 'संविधान' म्हणून संदर्भित) वापर करून, जी. एस. एफ. सी. च्या अधिकारक्षेत्रावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा अर्ज दाखल केला, तो रद्द करण्यात आला, त्या विरोधात उच्च न्यायालयात रिट याचिका क्रमांक १६००८/१९९५ दाखल केली होती, जी दि. १८/०१/१९९६ रोजी फेटाळण्यात आली.

११. दरम्यान, एफ. आय. आर. क्रमांक ९२, दि.०५/०४/१९९५ (वर वर्णन

केलेले) मधील एक आरोपी तसेच अभिकथित तस्कर नावे सुरजित सिंग उर्फ पहलवान यांनी फौजदारी किरकोळ क्र.१०५६२-एम/१९९६ द्वारे उच्च न्यायालयात धाव घेऊन त्याच्याविरोधातील एफ. आय. आर. रद्द करण्याची मागणी केली. कथित घटनेच्या दिवशी, सुरजित सिंग उर्फ पहलवान हे अमृतसरच्या मध्यवर्ती कारागृहात बंद असल्याने ते या गुन्ह्यात सहभागी होऊ शकत नाही, असा युक्तिवाद करण्यात आला. दि. ०१/११/१९९६ रोजी च्या आदेशानुसार ही याचिका मंजूर करण्यात आली होती.

१२. दि. १०/०४/१९९६ रोजी, जी. एस. एफ. सी. ने आपला निर्णय दिला, ज्यामध्ये अपीलकर्त्याला पहिल्या आरोपात दोषमुक्त तर दुसऱ्या आणि तिसऱ्या आरोपात दोषी ठरविण्यात आले. जी. एस. एफ. सी. ने त्याला १० वर्षांच्या कठोर कारावासाची शिक्षा सुनावली; रु.१,००,०००/- लाखाचा दंड ठोठावला आणि त्याला सेवेतून काढून टाकले. पुष्टी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी शिक्षा कायम केली.

१३. त्यानंतर, दि. १५/०५/१९९६ रोजी त्याच्या दोषसिद्धी आणि शिक्षेच्या विरोधात अपीलकर्त्याने कायदेशीर याचिका दाखल केली. संबंधित प्राधिकरणाद्वारे यावर निर्णय न घेतल्यामुळे, अपीलकर्त्याने दिवाणी रिट याचिका क्रमांक १३०२०/१९९६ द्वारे उच्च न्यायालयात धाव घेतली, जी दि. २८/०८/१९९६ रोजीच्या आदेशाद्वारे निकाली काढण्यात आली आणि उत्तरवादी-प्राधिकरणाला दोन महिन्यांच्या कालावधीत वैधानिक याचिका निकाली काढण्याचे निर्देश देण्यात आले.

१४. त्यानुसार, उत्तरवादी-प्राधिकरणाने दि. ०२/११/१९९६ रोजी अपीलकर्त्याची वैधानिक याचिका रद्द केली. या पार्श्वभूमीवर, अपीलकर्त्याने त्याचा खटला आणि त्यातील आक्षेपीत आदेश रद्द करण्यासाठी उच्च न्यायालयासमोर फौजदारी रिट याचिका क्रमांक ३/१९९७ दाखल केली, तसेच सर्व परिणामी आदेश रद्द करण्यासाठी आणि अपीलकर्त्याला निवृत्तीवेतन आणि इतर लाभ जारी देण्याचे निर्देशही मागितले.

१५. दि. १९/०९/१९९७ रोजी [१९९७ एससीसी ऑनलाइन पी अँड एच ११७६], अपीलकर्त्याला उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आणि ते दि. १९/०९/१९९७ पासून दि.१९/०२/२०१० पर्यंत जामिनावर होते.

१६. दरम्यान, इतर सहआरोपी म्हणजेच लखविंदर सिंग यांना, न्यायचौकशी न्यायालयाने, पुराव्याअभावी आरोपमुक्त केले.

१७. उच्च न्यायालयाने दि. १९/०२/२०१० रोजी फौजदारी रिट याचिका क्रमांक ३/१९९७ फेटाळली, जो आक्षेपित निर्णय आहे.

**<u>अपीलकर्त्याचे सादर निवेदन :</u>**

१८. अपीलकर्त्याच्या विद्वान अधिवक्तांनी असे सादर केले की, आरोप क्रमांक १ चा विचार करता, म्हणजे, दि. ९/१० मार्च १९९५ च्या मध्यरात्री, त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या बी. ओ. पी. बॅरेकच्या सीमा कुंपण क्रमांक २०५ द्वारे भारतातून पाकिस्तानात एसिटिक एनहायड्राइडच्या प्रत्येकी ४० लिटरच्या ३० जेरीकॅनस बाहेर काढण्याची जाणीवपूर्वक परवानगी लखविंदर सिंग ह्यास दिली होती, हे अपीलकर्त्याच्या विरोधात सिद्ध झाले नाही.

१९. तथापि, अपीलकर्त्याच्या विद्वान अधिवक्तांनी असे सादर केले की, आरोप क्रमांक २, ज्याची तारीख (तारखा) जरी ४/५ एप्रिल, १९९५ असली तरी आरोप समान असून, ज्यामध्ये अपीलकर्त्याने दोन तस्करांना त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या बी. ओ. पी. बॅरेकच्या सीमा कुंपण क्रमांक २०५ वरून भारतातून पाकिस्तानात एसिटिक एनहायड्राइडच्या प्रत्येकी ४० लिटरच्या ४४ जेरीकॅनस बाहेर काढण्याची जाणीवपूर्वक परवानगी दिली असून, हि बाब जी. एस. एफ. सी. ने सिद्ध केली आहे असे म्हणणे हे स्पष्टपणे टिकण्याजोगे नाही कारण (ह्यातील) एक आरोपी सुरजित सिंग उर्फ पहलवान याला उच्च न्यायालयाने त्याच्या विरोधात दाखल एफ. आय. आर. तो वर नमूद तारखेला अमृतसरच्या मध्यवर्ती कारागृहात बंद होता या आधारावर रद्द करून दिलासा दिला होता आणि इतर सहआरोपी लखविंदर सिंग याला देखील पुराव्याच्या अभावी न्यायचौकशी न्यायालयाने खटल्याच्या सुनावणीतून मुक्त करण्यात आले होते. अशा प्रकारे, विद्वान अधिवक्ता यांच्या नुसार, दोन व्यक्ती ज्यांनी जेरीकॅन्सना घेऊन गेल्याचे सांगण्यात आले होते, त्यांचीच सुटका झालेली असल्याने, अपीलकर्त्याविरुद्धचा खटला आपोआप अयशस्वी ठरतो. नोव्हेंबर, १९९४ ते एप्रिल, १९९५ दरम्यान ममडोट येथे दलाच्या (फोर्स) ६७ व्या बटालियनचे कमांडंट म्हणून त्यांच्या कार्यकाळात सैन्याच्या सुव्यवस्था आणि शिस्तीसाठी जाणूनबुजून पूर्वग्रहदूषित वागण्याचा आणि भारतातून प्रतिबंधित वस्तूंची कथित तस्करी सुलभ करण्यासाठी त्यांच्या युनिटच्या सुभेदार दिदार सिंग यांच्यावर अनुचित प्रभाव टाकण्याचा आरोप क्रमांक ३ चा विचार केल्यास, तो स्पष्टपणे सिद्ध होत

नाही कारण ते उक्त दिदार सिंग (जे त्यांचे अधीनस्थ होते आणि ज्या भागात ही कृती झाल्याचा आरोप आहे त्या क्षेत्राचे वास्तविक प्रभारी होते) यांच्या विधानावर आधारित असून, स्पष्टपणे असे दिसून येते कि, त्यांनी स्पष्ट आणि गंभीर परिणामांपासून स्वतःला वाचवण्यासाठी हे विधान केले आहे, जे त्यात समाविष्ट होते. विद्वान अधिवक्ता यांनी सादर केले की हे अपीलकर्त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरूनही केलेले असू शकते, कारण त्याबद्दल खरी भीती होती, कारण अपीलकर्त्याने यापूर्वीच्या प्रसंगी त्याच्या नियंत्रक अधिकाऱ्याला जबाबदार धरण्यास ठामपणे नकार दिला होता. बी. एस. एफ. अधिनियमात जी. एस. एफ. सी. ने एन. डी. पी. एस. अधिनियमा अंतर्गत गुन्ह्यांचा खटला चालवण्याचा विचार केलेला नाही आणि अपीलकर्त्याविरुद्ध खटला सुरू करण्यासाठी एन. डी. पी. एस. अधिनियमाच्या कलम ५९(३) अंतर्गत आणि त्यानुसार आवश्यक असलेल्या मंजुरी देखील केंद्र सरकारकडून प्राप्त केलेली नव्हती, त्यामुळे खटला स्वतःच रद्दबातल ठरतो, असा युक्तिवाद करण्यात आला. पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की बी. एस. एफ. नियम, १९६९ च्या नियम १०२ मध्ये (यापुढे 'नियम' म्हणून संदर्भित) अशी तरतूद आहे की आरोपी दोषी आढळलेल्या सर्व गुन्ह्यांच्या संदर्भात केवळ एकच शिक्षा देण्यात यावी. तथापि, सध्याच्या प्रकरणात तीन शिक्षा देण्यात आल्या, ज्या बी. एस. एफ. अधिनियम कलम ४८ सह नियम १०२ चे उल्लंघन करते.

२०. हे विद्वान अधिवक्तांचे निवेदन होते की सेवेतून बडतर्फ करण्याची शिक्षा देखील बेकायदेशीर आहे कारण अपीलकर्ता संबंधित आरोपपत्र जारी होण्यापूर्वीच दि. ३१/०८/१९९५ रोजी निवृत्त झालेले आहेत आणि अशा प्रकारे सेवेतून बडतर्फ करण्याची कोणतीही शिक्षा होऊ शकत नाही, जी नियम १६६ अन्वये स्पष्ट करण्यात आली आहे, ज्यामध्ये असे नमूद केले आहे की बडतर्फ करण्याची शिक्षा, ती जाहीर करण्याच्या तारखेपासून किंवा घोषणेच्या वेळी निर्दिष्ट केल्या जाणाऱ्या कोणत्याही त्यानंतरच्या तारखेपासून लागू होईल, जी सध्याच्या प्रकरणात अपीलकर्त्याच्या सेवेतून सेवानिवृत्त झाल्यानंतरची आहे. त्याचप्रमाणे, असा युक्तिवाद करण्यात आला की एकदा दि.०४/०७/१९९५ रोजीचे पहिले आरोपपत्र वरवर पाहता अपुऱ्या पुराव्यांमुळे, मागे घेतल्यानंतर, अपीलकर्त्याला नियम ५९(१)(आय) अंतर्गत आरोपमुक्त करणे आवश्यक

होते आणि अशा प्रकारे, दि. २०/१०/१९९५ रोजीचे दुसरे आरोपपत्र अजूनच बेकायदेशीर आहे, कारण नियमांचे प्रकरण आठ नुसार, बीएसएफ अधिनियम आणि नियमांनुसार कोणतेही दुसरे आरोपपत्र जारी करण्याची तरतूद नाही. जी. एस. एफ. सी. द्वारे आरोपपत्रात सुधारणा, म्हणजे आरोपपत्रात भर घालणे, वगळणे किंवा त्यात बदल करण्याची तरतूद नियमांमध्ये आहे; तर सध्याच्या प्रकरणात, अतिरिक्त डी. आय. जी. ने पूर्णपणे नवीन आरोपपत्र जारी केले होते, जे प्रत्यक्षात, दुसऱ्या खटल्यासारखे होते, जे बी. एस. एफ. अधिनियमाच्या कलम ७५ अंतर्गत प्रतिबंधित आहे.

२१. अपीलकर्त्याचे निवृत्तिवेतन, उपदान आणि इतर लाभ रोखण्याच्या मुद्द्यावर, असे सादर करण्यात आले होते की, दि. ३१/०८/१९९५ रोजी आधीच सेवानिवृत्त झाल्यानंतर, ते रोखण्याचा अधिकार दलात (फोर्स मध्ये) निहित नव्हता आणि अशा उद्धट आणि मनमानी कारवाईमुळे, आता सुमारे ८२ वर्षांचे असलेले आणि सुमारे २८ वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झालेले अपीलकर्ता अतिशय वाईट आर्थिक स्थितीत आहेत आणि त्याच्या दैनंदिन गरजा आणि वैद्यकीय खर्चासाठी कोणतेही साधन नसल्याने ते स्वतःला सांभाळण्यास असमर्थ आहेत.

२२. विद्वान अधिवक्ता यांनी असे सांगितले के, बी. एस. एफ. कायद्याच्या कलम ४८ (१) (के) आणि ४८(१) (एल) अंतर्गत विशिष्ट आदेश असल्याशिवाय निवृत्तीनंतर निवृत्तिवेतन, उपदान, रजेची रोकड आणि कोणत्याही सेवानिवृत्त व्यक्तीची इतर देयके/लाभ रोखण्याचा विचार बी. एस. एफ. अधिनियमात किंवा नियमांमध्ये करण्यात आलेला नाही. अन्यथा, असा युक्तिवाद करण्यात आला होता की निवृत्तिवेतन रोखणे हे केंद्रीय नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९७२ (यापुढे 'निवृत्तिवेतन नियम' म्हणून संदर्भित) च्या नियम ९ चे उल्लंघन आहे, ज्यामध्ये अशी तरतूद आहे की केवळ भारताचे माननीय राष्ट्रपतीच कर्मचाऱ्याचे निवृत्तिवेतन रोखू शकतात.

२३. अशा युक्तिवादाच्या समर्थनार्थ, स्टेट ऑफ झारखंड -विरुद्ध- जितेंद्र कुमार श्रीवास्तव, (२०१३) १२ एस. सी. सी. २१० या खटल्यातील या न्यायालयाच्या निर्णयांवर भर देण्यात आला, ज्यातील संबंधित परिच्छेद क्रमांक १६ मध्ये असे म्हटले आहे की, कायद्याच्या अधिकाराशिवाय एखाद्या व्यक्तीला त्याच्या निवृत्तिवेतनापासून वंचित ठेवले जाऊ शकत नाही, जो कि भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३००ए मध्ये नमूद केलेला

घटनात्मक महादेश आहे आणि पुढे, वीणा पांडे -विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया, (२०२२) २ एस. सी. सी. ३७९ मध्ये, संबंधित परिच्छेद क्रमांक १० मध्ये असे म्हटले आहे की, निवृत्तिवेतन हा दीर्घकाळ सेवा दिल्याबद्दल भरपाईचा विलंबित भाग असून तो कर्मचाऱ्यानि कष्टाने मिळवलेला लाभ असून तो मालमत्तेच्या स्वरूपाचा असल्याचे मानले गेले आहे. आम्ही दखल घेतो की अपीलकर्त्याने त्याची थकबाकी सोडण्यासाठी किंवा ज्या आदेशाद्वारे ती रोखण्यात आली आहे त्या आदेशाची प्रत मिळावी यासाठी विविध अधिकाऱ्यांना निवेदने दिली होती, जी लवकर सुनावणीसाठी चा अर्ज म्हणजेच क्रि. एम. पी. क्र. ७४७५६/२०२१, पान क्र. १६-१७ वर दाखल करण्यात आले होते.

२४. हे देखील सादर करण्यात आले की एसिटिक एनहायड्राइडचा विचार केला तर ते मादक औषध किंवा सायकोट्रॉपिक पदार्थ नसून, एन. डी. पी. एस. अधिनियमाच्या कलम ९ ए अंतर्गत केवळ नियंत्रित पदार्थ आहे, जो एन. डी. पी. एस. अधिनियमाच्या कलम २५ ए अंतर्गत दंडनीय आहे.

२५. सारांशात, अपीलकर्त्याच्या विद्वान अधिवक्ता यांनी असे सादर केले की, खटल्याच्या वेळी बी. एस. एफ. अधिनियम आणि नियम यातील इतर वैधानिक तरतुदींचे उल्लंघन झाले असून नैसर्गिक न्याय तत्त्वांचे देखील पालन करण्यात आले नाही.

<u>उत्तरवादिंचे सादर निवेदन :</u>

२६. दुसऱ्या बाजूस, उत्तरवादींच्या विद्वान वरिष्ठ अधिवक्ता यांनी आव्हानाखालील न्यायनिर्णयाचे समर्थन केले. अपीलकर्त्यावर एन. डी. पी. एस. अधिनियमाच्या कलम २५ सह बी. एस. एफ. अधिनियमाच्या कलम ४० आणि ४६ अंतर्गत आरोप ठेवण्यात आले असल्याने त्याच्यावर एन. डी. पी. एस. अधिनियमा अंतर्गत स्वतंत्रपणे खटला चालवण्यात कोणताही दोष नाही, असे सादर करण्यात आले.

२७. असा भर देण्यात आला कि, सुभेदार दिदार सिंग यांच्यावर जी. एस. एफ. सी. ने खटला चालवून त्यांना दोषी ठरवले आणि निवृत्तिवेतन आणि कठोर फटकारण्याच्या उद्देशाने दहा वर्षांची सेवा सेवा समाप्त करण्याची शिक्षा ठोठावण्यात आली, सुब. एन. के. सतपाल यांच्यावर जी. एस. एफ. सी. ने खटला चालवला आणि त्यांना लान्स नाईक (एल/एन. के.) या पदा वर पदावनत करण्यात आले तसेच

हवालदार केशव सिंग यांच्यावर जी. एस. एफ. सी. ने खटला चालवला आणि त्यांना दला मध्ये ४५ दिवसांच्या कठोर कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. असा युक्तिवाद करण्यात आला की अपीलकर्त्याला दोन कथित तस्करांच्या सुटकेचा लाभ मिळू शकत नाही कारण त्यांच्यावर प्रतिबंधित पदार्थ ज्या ठिकाणाहून जप्त करण्यात आला त्या ठिकाणी ठेवल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता, तर अपीलकर्त्यावर एन. डी. पी. एस. अधिनियमाच्या कलम २५ अंतर्गत आरोप ठेवण्यात आला होता. हे सादर करण्यात आले होते की प्रतिबंधित वस्तू, पाकिस्तानी बाजूकडे, त्या दलाच्या जवानांनी पहारा दिलेल्या प्रवेशद्वारातून गेल्याशिवाय, दलाच्या नियंत्रणाखाली असलेल्या क्षेत्राबाहेर, नेता येऊ शकल्या नसत्या, कारण ते अपीलकर्त्याच्या संपूर्ण नियंत्रणाखाली असलेले क्षेत्र होते. पुढे, असे सादर करण्यात आले की सुरजित सिंग उर्फ पहलवान यांना संबंधित एफ. आय. आर. रद्द करून दिलासा देण्यात आला, कारण ते घटनेच्या तारखेला तुरुंगात त्यांची तुरुंगवास भोगत असल्याची बाब स्थापित करू शकले.

२८. विद्वान अधिवक्ता यांनी असे सादर केले की अपीलकर्त्याला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, दोन तस्करांनी दलाच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने एसिटिक एनहायड्राइडच्या जेरीकॅन्स आंतरराष्ट्रीय सीमेजवळ ठेवल्या होत्या आणि जरी ते दोन व्यक्ती प्रमुख गुन्हेगार होते, तरी अशा हालचालीस मदत करण्यात अपीलकर्ता आणि दला च्या इतर अधिकारी/कर्मचाऱ्यांची भूमिका स्पष्टपणे सिद्ध झाली होती. सादर करण्यात आले होते की अपीलकर्ता या क्षेत्राच्या एकूण नियंत्रणात होता आणि म्हणूनच, येथे यापूर्वी वर्णन केलेल्या घटनांसाठी तो जबाबदार आहे.

२९. निवृत्तिवेतन, उपदान आणि इतर सेवानिवृत्ती लाभ रोखण्याच्या प्रश्नावर, उत्तरवादींच्या विद्वान अधिवक्ता यांनी सादर केले की अपीलकर्त्याला जी. पी. एफ. आणि सी. जी. ई. आय. एस. दिले गेले होते. पुढे, त्याला निवृत्तिवेतन नियमांच्या नियम ६९ अंतर्गत तात्पुरते निवृत्तिवेतनही देण्यात आले होते आणि नंतरच निवृत्तिवेतन नियमांच्या नियम २४ चा अवलंब करून ते थांबवण्यात आले, कारण सेवेतून बडतर्फ केल्याने पूर्वीची सेवा समाप्त होते, असे बारमध्ये नमूद करण्यात आले होते.

**<u>विश्लेषण, कारण आणि निर्णयः</u>**

३०. अभिलेखावरील तथ्यांचे अवलोकन केल्यास आणि संबंधित न्यायिक

निर्णयांचा अभ्यास केल्यास, एकूण तपासणी केल्यावर, हे न्यायालय उच्च न्यायालयाच्या विद्वान एकल खंडपीठाने घेतलेल्या मताचे समर्थन करू शकत नाही.

३१. प्रक्रिया आणि/किंवा खटल्यातील प्रक्रियात्मक कमतरता, ज्याचा उच्चार अपीलकर्त्याच्या विद्वान अधिवक्ता यांनी केला आहे, त्या हेतुपुरस्सर हाताळल्या गेल्या नाहीत. त्यावर कोणतेही मत व्यक्त न करता, आम्ही कायद्याच्या त्या प्रश्नांना अधिक योग्य प्रकरणात न्यायनिवाड्यासाठी राखून ठेवत आहोत, कारण आम्ही गुणवत्तेवर हस्तक्षेप करत आहोत.

३२. कौन्सिल ऑफ सिव्हिल सर्व्हिस युनियनस -विरुद्ध- मिनिस्टर फॉर द सिव्हिल सर्व्हिस, [१९८४] ३ डब्ल्यू. एल. आर. ११७४ (एच. एल.) मध्ये, हाऊस ऑफ लॉर्ड्सने, लॉर्ड डिप्लॉकच्या माध्यमातून बोलताना म्हटलेः

> *"मला वाटते की न्यायिक पुनर्वीलोकन आज अशा टप्प्यावर विकसित झाले आहे कि तो विकास ज्या पावलांद्वारे झाला आहे त्याचे कोणतेही विश्लेषण झाले नाही, एखादी व्यक्ती सोयीस्करपणे ज्या कारणांसाठी प्रशासकीय कारवाई न्यायिक पुनर्वीलोकनद्वारे नियंत्रित केली जाऊ शकते त्यास तीन वर्गा खाली वर्गीकृत करू शकते. पहिले कारण म्हणजे 'बेकायदेशीरपणा', दुसरे म्हणजे 'अतार्किकता' आणि तिसरे म्हणजे 'प्रक्रियात्मक अनुचितता' होय. याचा अर्थ असा नाही की प्रकरण निहाय प्रकरण पुढील विकास कालांतराने आणखी कारणे जोडू शकत नाही. माझ्या मनात विशेषतः असे आहे कि, युरोपीय आर्थिक समुदायाच्या आपल्या अनेक सहकारी सदस्यांच्या प्रशासकीय कायद्यात मान्यताप्राप्त असलेल्या 'प्रमाणबद्धतेच्या' तत्त्वाचा भविष्यात संभाव्य स्वीकार करावा;........"*

(भर दिला जातो)

३३. भगत राम -विरुद्ध- स्टेट ऑफ हिमाचल प्रदेश (१९८३) २ एस. सी. सी. ४४२ मध्ये असे मत व्यक्त करण्यात आले होतेः

> *"१५. ...लादलेला दंड हा गैरवर्तनाच्या गंभीरतेशी सुसंगत असला पाहिजे आणि गैरवर्तनाच्या गंभीरतेशी विसंगत असा कोणताही दंड राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ चे उल्लंघन करणारा असेल हे तितकेच खरे आहे....".*

(भर दिला जातो)

३४. रणजीत ठाकूर -विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया (१९८७) ४ एस. सी. सी. ६११ या प्रकरणात, या न्यायालयाने, त्यातील परिस्थितीत, परिच्छेद क्र. २७ मध्ये टिप्पणी केली आहे कि:

*".... ही शिक्षा इतकी लक्षणीयरीत्या असमान आहे की त्यात हस्तक्षेपाची गरज असून त्या गरजेचे समर्थन केले जाते. न्यायालयीन पुनर्वीलोकन करताना ते चुकीचे राहू दिले जाऊ शकत नाही.. "*

३५. आंध्र प्रदेश इंडस्ट्रियल इन्फ्रास्ट्रक्चर कॉर्पोरेशन लिमिटेड -विरुद्ध- एस. एन. राज कुमार (२०१८) ६ एस. सी. सी. ४१० या प्रकरणात, या न्यायालयाने खुलासा केला कि :

*"२०..... प्रशासकीय कायद्याच्या क्षेत्रात" "प्रमाणबद्धता" "हे एक असे तत्व आहे कि ज्यामध्ये न्यायालय अशा प्रक्रिया, पद्धत अथवा रीत यांच्याशी संबंधित आहे ज्याद्वारे निर्णयकर्त्याने त्याचे प्राधान्यक्रम निश्चित करून एखाद्या निष्कर्षावर किंवा निर्णयावर पोहोचला आहे. निर्णय घेण्याचे सार म्हणजे प्रकरणातील घटक आणि विचारांना सापेक्ष महत्त्व देणे. प्रमाणबद्धतेचा सिद्धांत अशा प्रकारे अनुज्ञेय प्राधान्यांच्या नियमाचा विस्ताराच्या अभ्यासाच्या खऱ्या स्वरूपावर लक्ष केंद्रित करते - [युनियन ऑफ इंडिया -विरुद्ध- जी. गणयुथम, (१९९७) ७ एससीसी ४६३ : १९९७ एससीसी (एल अँड एस) १८०६]. डी स्मिथ [ज्युडिशिअल रिव्हिव ऑफ ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ॲक्शन (१९९५), परिच्छेद १३.०८५, पृ. ६०१-६०५; आणि पहा, वेडः ॲडमिनिस्ट्रेटिव्ह लॉ (२००९), पृ. १५७-१५८, ३०६-३०८.] असेही नमूद करतात की "प्रमाणबद्धतेमध्ये" "समतोलतेची चाचणी" आणि "आवश्यकतेची चाचणी" समाविष्ट आहे. "समतोलतेची चाचणी" जास्त कठोर दंडांची छाननी किंवा अधिकार वा हितसंबंधांचे उल्लंघन आणि संबंधित विचारांचे स्पष्ट असंतुलन करण्यास अनुमती देते."*

(भर दिला जातो)

३६. निमलष्करी दलांसह संघराज्याच्या सशस्त्र दलांमध्ये, अत्यंत शिस्त, आदेशाची एकता इत्यादी अपरिहार्य आहेत याची आम्हाला जाणीव आहे. असे म्हटले

जाते की, प्रमाणबद्धतेचा सिद्धांत अजूनही क्षेत्र धारण करतो.

३७. अपीलकर्त्याविरुद्ध थेट आणि ठोस पुराव्याच्या अनुपस्थितीत, जरी जी. एस. एफ. सी. ला अपीलकर्त्याच्या गुन्ह्याची खात्री पटली असली, तरी दिलेली शिक्षा खूप कठोर होती, तरीही, अपीलकर्त्याने, प्रथमच गुन्हा केला असेल, आणि सराईत अपराधी नसेल, याकडे लक्ष द्यायला पाहिजे होते. युक्तिवादा करीत जरी असे मानण्यात आले कि, आरोपांमध्ये काही प्रमाणात सत्यतेचा आभास होता, तरीही दिलेली शिक्षा प्रमाणहीन होती.

३८. आणखी एक घटक ज्याने या न्यायालयाला येथे प्रमाणबद्धतेच्या बाबतीत आत्मपरीक्षण करण्यास प्रवृत्त केले आहे, तो म्हणजे अपीलकर्त्याने ३१.५ वर्षांहून अधिक काळ दोष किंवा कलंक न लागू देता देशाची सेवा केली आहे आणि त्याला इतर गोष्टींबरोबरच, विविध पुरस्कार तसेच भारताच्या माननीय राष्ट्रपतींकडून पदक देखील मिळालेले आहेत. अन्यथा, अपीलकर्त्याचा ट्रॅक रेकॉर्ड निर्विवाद आहे.

३९. जितेंद्र कुमार श्रीवास्तव (उपरोल्लेखित) आणि वीणा पांडे (उपरोल्लेखित) मध्ये उच्चारित प्रस्तावांशी कोणताही वाद नाही. डी. एस. नकारा -विरुद्ध- युनिअन ऑफ इंडिया (१९८३) १ एस. सी. सी. ३०५; स्टेट ऑफ वेस्ट बंगाल -विरुद्ध- हरेश सी. बॅनर्जी, (२००६) ७ एस. सी. सी. ६५१, आणि डॉ. हीरालाल -विरुद्ध- स्टेट ऑफ बिहार (२०२०) ४ एस. सी. सी. ३४६, या प्रकरणांमध्ये कायद्याची निश्चित स्थिती पुन्हा मांडण्याची गरज नाकारण्यात आली आहे-एखाद्या व्यक्तीला निवृत्तिवेतनापासून वंचित ठेवले जाऊ शकत नाही असा सातत्यपूर्ण दृष्टिकोन या न्यायालयाने घेतला आहे.

४०. जर परिस्थिती अशीच राहिली असती, तर आम्ही हे प्रकरण जी. एस. एफ. सी. कडे परत पाठवण्याचा विचार केला असता. परंतु, कालबाह्य झालेला दीर्घ कालावधी, अपीलकर्त्याचे वय आणि पुराव्याच्या पैलूवर खाली दिलेला आमचा निष्कर्ष पाहता, आम्ही त्या कृतीचा अवलंब करण्यापासून स्वतःला परावृत्त करतो.

४१. अभिकथित गुन्हेगारीच्या बाबतीत, निर्विवाद आणि निःशंक वस्तुस्थिती अशी आहे की जेरीकॅन्स ज्या ठिकाणाहून अभिकथितपणे भारताच्या बाजूने पाकिस्तानच्या बाजूला गेले होते त्या ठिकाणासह मोठ्या क्षेत्रावर संचालित दलाचे नेतृत्व अपीलकर्ता करत होते. तथापि, या क्षेत्राचे प्रत्यक्ष व्यवस्थापन हे दलाच्या अधीनस्थ

कर्मचाऱ्यांद्वारे केले जाते याबाबतीत देखील काही वाद नाही. सध्याच्या प्रकरणात, अधीनस्थ कर्मचाऱ्यांना दोषी ठरवण्यात आले आहे, जे त्यांचा सक्रिय सहभाग दर्शवते. घटनास्थळावर हजर असल्याने, त्यांच्या देखरेखीखाली कोणतेही अपराध/गुन्हे/संशयास्पद घटना घडणार नाहीत याची खात्री करणे ही त्यांची प्राथमिक जबाबदारी होती. शिवाय, अपीलकर्त्याच्या विरोधात कोणताही थेट पुरावा नाही.

४२. उदाहरणार्थ, पोलीस अधीक्षकांच्या अधिकारक्षेत्रात एखादा गुन्हा घडतो आणि त्यातून निर्माण होणाऱ्या फौजदारी कारवाईत काही पोलीस कर्मचाऱ्यांना दोषी ठरवले जाते आणि त्यानंतर, अशा कृतकृताच्या आधारे फौजदारी खटला तसेच विभागीय कार्यवाही देखील सुरु केली, अशा स्थितिविशेष वरून अशी तुलना करणे योग्य ठरणार नाही कि अशी घटना त्यांच्या संपूर्ण देखरेखीखाली आणि नियंत्रणाखाली घडली आहे. हे कर्तव्याची अवहेलना आणि/किंवा सक्रिय संगनमत या तत्त्वाचा अत्यंत टोकाचा आणि असमंजसपणाचा विस्तार असेल, ज्यात अपराधीपणा स्थापित करणारा खूप पुरावा नसेल किंवा अगदी कमीतकमी, त्याच्या निर्दोषतेची संभाव्यता नाकारन्याय येईल.

४३. हे न्यायालय त्वरेने असे म्हणेल की, असे म्हणणे कि अपीलकर्त्याची कमांडंट म्हणून अशी घटना रोखण्याची जवाबदारी/कर्तव्य नव्हते म्हणून याचा अर्थ असा नाही कि त्याला अशा गुन्ह्याचा क्रियाशील भागीदार आणि/किंवा सहाय्यक म्हणून लेबल लावण्याइतपत त्याचा विस्तार करण्यात यावा आणि सध्याच्या तथ्यात्मक रचनेचा विचार करता, पूर्णपणे अन्यायकारक आहे. विशेष म्हणजे, केवळ सुभेदार दीदार सिंग यांच्या जवाबाच्या बळावर अपीलकर्त्याला शिक्षा सुनावण्यात आली -ज्याने या घटनेत आपला सहभाग असल्याचे कबूल केले आहे आणि त्यात भर टाकून असे म्हटले जाते, कि ते अपीलकर्त्याच्या सांगण्यावरून आणि त्याच्या निर्देशानुसार करण्यात आले होते.

४४. मोहम्मद. जमीलुद्दीन नासिर -विरुद्ध- स्टेट ऑफ वेस्ट बंगाल (२०१४) ७ एस. सी. सी. ४४३, पुरावा अधिनियम, १८७२ च्या कलम १० आणि ३० चे परीक्षण करताना असे प्रतिपादन केले कि :

*"१४४. वरील तरतुदींनुसार, <u>अपीलकर्ता नासिरच्या कबुलीजबाबची प्रासंगिकता, परिणामकारकता आणि विश्वासार्हता जेव्हा पुरावा अधिनियमाच्या कलम १० आणि ३० च्या कसोटीवर तपासली जाते, तेव्हा असे नमूद करावे लागेल की</u>*

*सहआरोपीच्या कबुलीजबाबाला, ज्याने कबुलीजबाब दिला त्या व्यक्तीव्यतिरिक्त अन्य व्यक्तीला दोषी ठरवण्यासाठी ठोस पुरावा म्हणून मानले जाऊ शकत नाही. तथापि, या न्यायालयाच्या अनेक निर्णयांमध्ये हे सुस्थापित आणि पुनरुच्चारित आहे की अभिलेखातील इतर पुराव्यांच्या विचारांच्या आधारे आणि जर असा पुरावा फिर्यादीच्या खटल्याला पुरेसे समर्थन देत असेल आणि जर त्याला आणखी पाठिंब्याची आवश्यकता असेल तर सहआरोपीच्या कबुलीजबाबावर दबाव आणला जाऊ शकतो आणि त्याच्यावर अवलंबून राहू शकतो.* *दुसऱ्या शब्दांत, कट रचून गुन्हा केल्याचा आरोप असलेल्या व्यक्तींमध्ये संगती आणि संबंध होता यावर वाजवीपणे विश्वास ठेवण्यासाठी पुरेसे साहित्य असल्यास, हे महत्त्वाचे नाही कि ते एकमेकांसाठी अनोळखी होते आणि त्यांनी संयुक्त प्रयत्नातून केलेल्या अशा कृत्यांबद्दल त्यांनी बजावलेल्या वास्तविक भूमिकेबद्दल ते अनभिज्ञ होते. पुरावा अधिनियमाच्या कलम ३० नुसार, जेव्हा एकाच गुन्ह्यासाठी एकापेक्षा जास्त व्यक्तींवर संयुक्तपणे खटला चालवला जातो आणि अशा व्यक्तींपैकी एकाने केलेल्या कबुलीजबाबामुळे जवाब देणारा तसेच सहआरोपी प्रभावित झाल्याचे आढळून येते आणि ते पुरेसे सिद्ध होते, तेव्हा न्यायालय इतर व्यक्तींविरुद्ध आणि वरील प्रस्तावातून अशी कबुलीजबाब देणाऱ्या व्यक्तीविरुद्धही अशी कबुलीजबाब विचारात घेऊ शकते, नटवरलाल साकरलाल मोदी -विरुद्ध- स्टेट ऑफ मुंबई [(१९६३) ६५ बॉम एल. आर. ६६० (एस. सी.) आणि सरकार (एन. सी. टी. दिल्ली) -विरुद्ध- जसपाल सिंग [(२००३) १० एस. सी. सी. ५८६: २००४ एससीसी (सी. आर. आय.)९३३]या प्रकरणातील या न्यायालयाच्या निर्णयांचा आपण संदर्भ घेऊ शकतो".*

(भर दिला जातो)

४५. यापूर्वी अधोरेखित केल्याप्रमाणे, सुभेदार डी. एस. यांचा जवाब वगळता, अपीलकर्त्याचा सहभाग दाखविणारा, त्याच्या विरोधात कोणतेही इतर पुरावा नाही. त्यामुळे, अन्य गोष्टी समान असताना, अपीलकर्त्याला दोषारोपित करणाऱ्या किंवा त्याच्या अपराधाकडे लक्ष वेधून घेणाऱ्या तथ्य नसताना, केवळ एका व्यक्तीच्या जवाबामुळे, या प्रकरणात, त्याला दोषी ठरवता येऊ नये.

४६. या न्यायालयाला याची जाणीव आहे की, नजीकच्या काळात, अपीलकर्त्याच्या घराच्या शोधमोहिमेत, कोणतीही आक्षेपार्ह कागदपत्रे/वस्तू जप्त करण्यात आली नाहीत. अशी पुनःप्राप्ती न झाल्यास स्पष्टपणे त्याचा अपीलकर्त्याला फायदा होईल.

४७. पुराव्याचा अभाव असल्याची विनवणी चा विचार करण्यास नकार देताना, विद्वान एकल खंडपीठाने, आक्षेपित निर्णयाच्या पृष्ठ १३ (१९ पैकी) वर टिप्पणी केली आहे कि :

*"सर्वोच्च न्यायालयासह विविध न्यायालयांनी सातत्याने नमूद केल्याप्रमाणे, पुराव्यांच्या मूल्यांकनाच्या आधारे सुरक्षा दल न्यायालयाने दिलेला निष्कर्ष हा रिट न्यायालयाच्या कार्यक्षेत्राबाहेरचा असेल".*

४८. उच्च न्यायालयाने हे लक्षात घ्यायला हवे होते की, उपस्थित केलेल्या मुद्द्याचे (मुद्द्यांचे) गांभीर्य लक्षात घेता, फौजदारी रिट याचिकेतही पुराव्याची छाननी करण्याचा अधिकार त्यास नाकारण्यात आलेला नव्हता. नवाब शकफथ अली खान -विरुद्ध- नवाब इमदाद जाह बहादूर, (२००९) ५ एस. सी. सी. १६२ या खटल्यात या न्यायालयाने असे प्रतिपादन केले कि :

*"४८. जर उच्च न्यायालयाला भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ आणि २२७ अंतर्गत अपील किंवा पुनरीक्षण अर्ज किंवा रिट याचिकेवर सुनावणी करण्याचा अधिकार असेल, तर दिलेल्या प्रकरणात, इतर अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून, ते पुनरीक्षण अर्ज किंवा रिट याचिकेचे अपीलमध्ये किंवा त्याच्या अंतर्निहित अधिकाराचा वापर करून त्याचप्रमाणे उलटपक्षी रूपांतर देखील करू शकते. तथापि, निर्विवादपणे, या उद्देशासाठी, अशा अधिकारक्षेत्राच्या वापरासाठी योग्य प्रकरण असणे आवश्यक आहे."*

(भर दिला जातो)

४९. सूर्य देव राय -विरुद्ध- राम चंदर राय, (२००३) ६ एस. सी. सी. ६७५ मध्ये अधोरेखित केल्याप्रमाणे, कायद्याच्या वरील विधानाशी आदरपूर्वक सहमती दर्शविताना, आम्ही पुनरुच्चार करतो की उच्च न्यायालयांनी, अनुच्छेद २२६ आणि/किंवा २२७ अंतर्गत, *"....फक्त न्यायिक अनुभव आणि न्यायाधीशांच्या व्यावहारिक शहाणपणाने*

*समृद्ध झालेल्या त्यांच्या विवेकबुद्धीचा वापर करणे आवश्यक आहे."* हे मार्गदर्शक तत्त्व अजूनही या क्षेत्रावर नियंत्रण ठेवते आणि राधे श्याम -विरुद्ध- छबी नाथ, (२०१५) ५ एस. सी. सी. ४२३ मधील ३-न्यायाधीशांच्या खंडपीठाने खाली दिलेल्या अटींप्रमाणे सूर्य देव राय (उपरोल्लेखित) मधील न्यायनिर्णनयला केवळ अंशतः वरचढ केली आहे:

*"२९.१. दिवाणी न्यायालयाचे न्यायिक आदेश राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत रिट अधिकारक्षेत्रास पात्र नाहीत.*

*२९.२. अनुच्छेद २२७ अंतर्गत अधिकारक्षेत्र हे अनुच्छेद २२६ अंतर्गत अधिकारक्षेत्रापेक्षा वेगळे आहे.*

*२९.३. सूर्य देव राय [सूर्य देव राय -विरुद्ध- राम चंदर राय, (२००३) ६ एस. सी. सी. ६७५] मधील विरोधाभासी दृष्टिकोन नामंजूर करण्यात आला आहे."*

५०. राज्यघटनेचे अनुच्छेद २२६ हे अन्यायाच्या निवारणासाठी मदत प्रदान करते आणि अशा अधिकाराच्या वापरावरील कोणतीही मर्यादा केवळ स्वतः लादलेली असतात. इतरांबरोबरच, ए. व्ही. वेंकटेश्वरन -विरुद्ध- रामचंद शोभराज वाधवानी, (१९६२) १ एस. सी. आर. ५७३ आणि यू. पी. स्टेट शुगर कॉर्पोरेशन लिमिटेड -विरुद्ध- कमल स्वरूप टंडन, (२००८) २ एस. सी. सी. ४१ यांचा फायदेशीर संदर्भ दिला जाऊ शकतो. घटनात्मक योजनेच्या अंतर्गत उच्च न्यायालयांना नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी विशेषाधिकारात्मक रिट जारी करण्याची क्षमता आहे. नेमके याच कारणासाठी, या न्यायालयाने कधीही अशी कोणतीही अवरोधिक तत्त्वे मांडली नाहीत जी राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ किंवा २२७ अंतर्गत निहित असलेल्या असाधारण अधिकारांना 'दडपून टाकणारी, बंदिस्त आणि मर्यादित' असल्याचे म्हटले जाऊ शकते [जी ई. पी. रोयप्पा -विरुद्ध- स्टेट ऑफ तामिळनाडू, १९७४ ए. आय. आर. एस. सी. ५५५ मध्ये मान. भगवती, न्यायमूर्ती (त्यावेळी ते जसे होते) यांनी वापरलेल्या शब्दांवरून प्रतिपादन केलेले आहे. नवाब शकाफत अली खान (उपरोल्लेखित) यांच्या आदेशानुसार, उच्च न्यायालयाने सखोल चौकशी करण्यासाठी हे एक योग्य प्रकरण होते, विशेषतः जेव्हा त्यात तथ्यांच्या क्षेत्रात संचार करणे समाविष्ट नव्हते.

५१. वर नमूद केलेल्या कारणांमुळे, हे फौजदारी अपील यशस्वी होते आणि मान्य करण्यात येते. परिणामी, (अ) आक्षेपित निर्णय रद्द केला जातो आणि (ब) जी. एस.

एफ. सी. ने दि.१०/०४/१९९६ रोजी दिलेला दोषसिद्धीचा निर्णय आणि शिक्षा देखील रद्द केली जाते. अपीलकर्ता त्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपासून आजपर्यंत पूर्ण सेवानिवृत्तीचे लाभ मिळण्यास पात्र आहे. त्याला आधीच भरलेली रक्कम (असल्यास) समायोजित केल्यानंतर, देय असलेल्या सर्व देयकांबाबतची कार्यवाही आजपासून बारा आठवड्यांच्या आत करण्यात यावी.

५२. खर्च सुकर करण्यात आले.

**<u>अतिरिक्त निर्देश :</u>**

५३. पेपरबुकमध्ये संलग्न केलेला आक्षेपित न्यायनिर्णय हे उच्च न्यायालयाकडून प्राप्त प्रमाणित प्रत आहे. तथापि, त्यास परिच्छेदानुसार क्रमांक देण्यात आलेले नाही.

५४. शकुंतला शुक्ला -विरुद्ध- स्टेट ऑफ उत्तर प्रदेश, २०२१ एस. सी. सी. ऑनलाईन एस. सी. ६७२ या प्रकरणात, या न्यायालयाला खालीलप्रमाणे निरीक्षण मांडण्याची संधी मिळाली :

> *"३५. ......निर्णयाची रचना सुसंगत, पद्धतशीर आणि तर्कशुद्ध पद्धतीने केली गेली पाहिजे....."*

५५. त्याचप्रमाणे, स्टेट बँक ऑफ इंडिया -विरुद्ध- अजय कुमार सूद, २०२२ एस. सी. सी. ऑनलाईन एस. सी. १०६७ या प्रकरणात, या न्यायालयाने मत व्यक्त केले कि :

> *"२१. <u>सर्व न्यायनिर्णयांमध्ये परिच्छेद क्रमांक ठेवणे उपयुक्त आहे कारण त्याने न्यायनिर्णयाची संदर्भ सुलभता आणि रचना वाढते, तसेच त्याची वाचनीयता आणि सुलभता सुधारते.</u> दीर्घ आवृत्तीतील विषय सूची वाचकांपर्यंत पोहोचण्यात मदत करते."*

५६. सर्व न्यायालयांनी आणि न्यायाधिकरणांनी, व्यवहारातील बाब म्हणून, सर्व आदेश आणि निकालांमध्ये, आधी देण्यात आलेल्या न्यायनिर्णयामध्ये परिणाम व्हावा या दृष्टीने, परिच्छेदांना यथानुक्रम देणे इष्ट आहे.

५७. परिच्छेदासह निर्णय आणि आदेशांसाठी एकसमान स्वरूप स्वीकारण्याचा विचार करण्यासाठी, विद्वान सरचिटणीस यांनी हा निर्णय सर्व उच्च न्यायालयांच्या विद्वान निबंधक महासंचालकांना पाठवतील आणि तो माननीय मुख्य न्यायाधीशांसमोर

ठेवतील. विद्वान मुख्य न्यायाधीश त्यांच्या उच्च न्यायालयांच्या अधीन असलेल्या न्यायालयांना आणि न्यायाधिकरणांना देखील त्यानुसार निर्देश देऊ शकतात.

अपील मान्य करण्यात आली.

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी वैध मानला जाईल."